# कृषि संशोधन केन्द्र, अचलपुर

जि. अमरावती (महा.) -४४४८०६

## (डॉ. पंजाबरावदेशमुख कृषिविद्यापीठ, अकोला)

जा.क्र.कृ.सं.के./अचल./ २५७/२०१९ दि. ३०/०४/२०१९

## निविदा सुचना

प्रति,

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

विषय :- कृषि संशोधन केंद्र, अचलपूर च्या प्रक्षेत्रावरील विविध कामे जे.सी.बी च्या सहाय्याने करुन घेण्याबाबत.

वरील विषयाच्या अनूषंगाने कळविण्यात येते की, कृषि संशोधन केंद्र, अचलपूर येथे संत्रा,मोसंबीची लागवड करण्याकरिता गादी वाफे तयार करणे, जमिनीचे सपाटीकरण, इतर फळझाडांच्या लागवडीकरिता काटेरी झाडे झुडपे काढणे, शेततळे तयार करणे व इतर किरकोळ कामे जे.सी.बी. मशीन च्या सहाय्याने करावयाची आहे. या करिता सुमारे २०० ते २२५ तास इतका कालावधी लागण्याचा अंदाज आहे. तरी जे.सी.बी. धारकांनी **जे.सी.बी मशीनचे प्रती तास दर**बंद लिफाफ्यात कार्यालयीन वेळेत दिनांक ०८/०५/२०१९ पर्यत या कार्यालयात पोहोचतील या बेताने " **सहयोगी प्राध्यापक (कृषि विद्या), कृषि संशोधन केंद्र, अचलपूर**" या पत्त्यावर पाठविण्यात यावे.

अटी व शर्ती:-

१ सोपविलेले काम सुरु करण्याअगोदर जे.सी.बी. धारकाने नोंदणीकृत परवानाधारक असल्याचेप्रमाणपत्र सादर करावे.

२ काम सुरु करण्याअगोदर निविदा धारकाने १०० रु. चे स्टॅम्प पेपर वर करारनामा लिहुन देण्याचे करावे.

३ शासकीय नियमानुसार वस्तु व सेवा कर कपात करण्यात येईल.

४ प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष काम सुरु झाल्यापासून तासाची गणना करण्यात येईल. मशिनीचा वाहतुकीचा खर्च जे.सी. बी. धारकाला करावा लागेल.

५ अपघात, दुखापत, नैसर्गिक/इतर कुठल्याही प्रकारची घटना घडल्यास कार्यालय प्रमुख जबाबदार राहणार नाही.

६ काम अर्धवट सोडता येणार नाही. सोपविण्यात आलेले काम देण्यात आलेल्या मुदतीमध्ये पुर्ण करावे लागेल.

७ काम समाधानकारक झाल्यानंतरच देयकाचे शोधन केल्या जाईल.

८ सोपविण्यात आलेल्या कामाची गुणवत्ता समाधानकारक नसल्यास सदर काम रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार प्रभारी अधिकारी यांना असतील.

९ मंजुर झालेल्या दर व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भुगतान या कार्यालयामार्फत होणार नाही.

१० कामाचे वाढविण्याचे/कमी करणे संपूर्ण अधिकार प्रभारी अधिकारी यांना असतील.

सहयोगी प्राध्यापक (कृषि विद्या)
कृषि संशोधन केंद्र, अचलपूर

Inward No. 33
Dt. 3-5-019